Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१
दूरध्वनी: +९१–२२–३५५५ ५००० • फॅक्स: +९१–२२–२२०४ २२६८/+९१–२२–२२८५ २२१४
ई–मेल: investor.relations@ril.com • CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

## (अ) वार्षिक सर्वसाधारण सभा

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीच्या सदस्यांची एक्केचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (पोस्ट–आयपीओ) गुरुवार दिनांक ५ जुलै २०१८ रोजी सकाळी ११ (भाप्रवेळ) वाजता बिरला मातुश्री सभागार, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, बॉम्बे हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेन्टर जवळ, न्यू मरिन लाईन्स, मुंबई – ४०० ०२० (''सभा'') येथे होईल.

सभा बोलाविणाऱ्या सूचनेसह आर्थिक वर्ष २०१७–१८ चा एकत्रित वार्षिक अहवाल सदस्यांना त्यांच्या नोंदणी करण्यात आलेल्या पत्यावर पोस्टाने/कुरिअरने पाठविण्यात आला आहे आणि ज्यांनी डिपॉझिटरीज/कंपनी यांच्यापाशी आपला ई–मेलचा पत्ता नोंदविला आहे अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आला आहे.

संबंधित एकत्रित वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर (www.ril.com) उपलब्ध आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या तारखेपर्यंत कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कामकाजाच्या वेळेत तपासणीसाठी उपलब्ध आहे.

कंपनीद्वारा आपल्या सदस्यांसाठी सभेच्या ठिकाणी मंजूर करण्यात येणाऱ्या ठरावांवर मतदानाचा अधिकार वापरण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे (''ई–मतदान''). सदस्य सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेचा उपयोग करून आपले मतदान करू शकतात (''दूरस्थ ई–मतदान''). कंपनीने कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड (''कार्वी'') यांची ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एजन्सी म्हणून सेवा घेतली आहे.

दूरस्थ ई–मतदान आणि युजर आयडी व पासवर्ड ह्यासंबंधी पत्र व सभेची माहिती देणाऱ्या सूचनेची प्रत सदस्यांना पाठविण्यात आली आहे. या पत्राचा नमुना आणि सभेची सूचना कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर **https://evoting.karvy.com** येथे उपलब्ध आहे.

**दूरस्थ ई–मतदान सुविधा शनिवार, ३० जून २०१८ रोजी सकाळी ९ (भाप्रवेळ) वाजता सुरू होईल आणि बुधवार, ४ जुलै २०१८ रोजी सायंकाळी ५ (भाप्रवेळ) वाजता बंद होईल. ह्या तारखेनंतर आणि वेळेनंतर दूरस्थ ई–मतदान करण्याची परवानगी नाही.**

**गुरुवार, २८ जून २०१८ ह्या तारखेला ज्या सदस्यांचे/लाभधारकाचे नाव कंपनीच्या रजिस्टरवर असेल फक्त तेच दूरस्थ ई–मतदानास/सभेच्या ठिकाणी ई–मतदान करण्यास पात्र असतील.**

सभेची सूचना पाठविल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि समभाग धारण करत असल्यास, त्यांनी **evoting@karvy.com** येथे विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड मिळवावा. यूजर आयडी व पासवर्ड मिळविण्याची तपशिलवार पद्धती सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे जी कंपनीच्या वेबसाईटवर आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. जर सदस्याने कार्वी यांचेपाशी दूरस्थ ई–मतदानासाठी अगोदरच नोंदणी केली असेल तर तो त्या युजर आयडीचा आणि पासवर्डचा उपयोग दूरस्थ मतदान करण्यासाठी करू शकतो.

**ज्यांनी दूरस्थ मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले असेल असे सदस्य सभेला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील.**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे मतदान करण्याची सुविधा सभेच्या वेळी उपलब्ध करून देण्यात येईल **('इन्स्टा पोल')** आणि ज्यांनी दूरस्थ ई–मतदान पद्धतीने आपले मतदान केले नाही असे सभेला उपस्थित राहणारे सदस्य सभेच्या वेळी इन्स्टा पोल पद्धतीने मतदान करू शकतील.

## (ब) रेकॉर्ड तारीख

ह्याद्वारे असेही सूचीत करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि त्यामधील लागू होणाऱ्या नियमांनुसार कंपनीद्वारे २०१७–१८ सालच्या आर्थिक वर्षातील संचालक मंडळाद्वारे शिफारस केलेला लाभांश घेण्यास पात्र असलेल्या सदस्यांची माहिती मिळविण्याकरिता गुरुवार दिनांक २८ जून २०१८ ही तारीख नमूद केलेली आहे.

ई–मतदानासंबंधी चौकशीसाठी/तक्रारीसाठी खालील संपर्काच्या तपशिलाची नोंद घेण्याची विनंती सदस्यांना करण्यात येत आहे:

श्री. एस्. पी. वेणूगोपाल – जूरल मॅनेजर, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, टोल फ्री नं. १८००–३४५४–००१, ई–मेल: evoting@karvy.com

करिता रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड
सही/–
**के. सेथुरामन**
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंम्पलायन्स ऑफीसर

ठिकाण : मुंबई
दिनांक : ११ जून, २०१८